कौ.हिं.म.सं.अ.अ.नं. १६/२०२३

नि. क्र. ३३ लगत

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ०१ स्वतः अर्जदार स्वाती संजय सोलीम यांचा उलटतपास शपथेवर, गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री. डोंगरे यांचेकडून</u> –**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, माझा विवाह ठरवून झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हे देखील मुळ कोकणातीलच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हे गेली अनेक वर्षे त्यांच्या कुटुंबासह पुणे येथे रहावयास आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२/०५/२०१४ रोजी माझा त्यांच्यासोबत विवाह झाल्यानंतर मी देखील पुणे येथे रहायला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, पुणे येथे मी, माझे पती, पतीचे आईवडिल, पतीचा भाऊ – भावजय यांच्यासोबत रहाण्यास होते. हे म्हणणे खरे नाही की, पुणे येथे आम्ही सर्व एकाच खोलीत एकत्र रहायचो.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, पुणे येथे आमची एकच खोली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीचे काका – दत्तात्रय सोलीम हे मुंबई येथे रहाण्यास होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती हे त्यावेळी शाळेमध्ये शिपाई म्हणून नोकरीस होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर घरातील सर्व जबाबदारी माझ्याकडे आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला स्वयंपाक येत नव्हता. साक्षीदार सांगते की, मला थोडा स्वयंपाक येत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी सासू स्वयंपाकाची सर्व जबाबदारी पार पाडायची. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे असताना उशिरा उठत होते.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, तेथे असताना मी घरकाम करण्यासाठी नोकरी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, कामावरुन घरी आल्यानंतर मी घरातील कोणतेही काम करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, घरातील सासू व पतीला न सांगता मी घरातून बाहेर जायचे. हे म्हणणे खरे नाही की, घरात असताना मी कोणाशी न बोलता

गप्प बसून रहात होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीशी देखील बोलत नव्हते.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, माझे माहेर डिंगणी, ता. संगमेश्वर येथील आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या माहेरी माझी आई, माझे काका असे रहाण्यास आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ मुंबई येथे रहाण्यास आहे.

**१७.** **प्रश्नः–** तुमची आई गावात एकटी असल्याने तुम्ही अनेक वेळा तिच्याकडे रहाण्यासाठी माहेरी यायचात, हे बरोबर आहे का ?

**उत्तरः–** त्या लोकांनीच मला माझ्या माहेरी आणून सोडले होते.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, मी काही महिने माझ्या भावाकडे मुंबई येथे रहाण्यास होते. हे म्हणणे खरे नाही की, मुंबई येथे मी मॉलमध्ये नोकरी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, ब–याच वेळा माझे पती माझ्या गावी मला परत नांदायला घेवून जाण्यासाठी आले होते.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, दि. ३१/०३/२०१९ रोजी माझे नातेवाईक व पतीचे नातेवाईक यांच्यामध्ये बैठक झाली होती. सदरची मिटींग लोवले येथे माझ्या पतीच्या गावी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बैठकीमध्ये माझे पतीदेखील हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बैठकीमध्ये किसन चिखलकर, उदय नितोरे, विलास खाडे, स्वप्निल नितोरे, गंगाराम नितोरे, सपना नितोरे व इतर असे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर बैठकीमध्ये माझ्या पतीची "मला स्वयंपाक येत नाही, मी उशिरापर्यंत झोपून रहाते, मी सतत बाहेर जात असते", अशी तक्रार होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नातेवाईकांनी ते सर्व आरोप स्विकारुन यापुढे ती आता व्यवस्थित नांदेल, असे म्हणून कागदपत्रांवर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर बैठकीनंतर मी माझ्या पतीकडे नांदायला गेले होते.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, मे–२०१९ मध्ये मी परत माझ्या गावी आले

होते. साक्षीदार पुढे सांगते की, त्यांनीच मला गावी आणून सोडले होते. हे म्हणणे खरे आहे की, मे–२०१९ मध्ये गावी आल्यानंतर मी पुन्हा माझ्या पतीकडे नांदायला गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः पुन्हा नांदण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पुन्हा नांदण्यासाठी मी माझ्या पतीला कोणतीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नातेवाईक, मध्यस्थी यांच्यामार्फत मी कोणतेही प्रयत्न केले नाहीत.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पतीकडे रहात असताना त्यांनी माझा छळ केलेबाबत मी पोलिस ठाण्यामध्ये कोठेही तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माहेरी आल्यानंतर देखील मी तशी कोणतीही तक्रार केलेली नाही. साक्षीदार सांगते की, मी पोलिसांकडे तक्रार दिली नव्हती, न्यायालयात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अंतर्गत तक्रार सादर केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासू–सासरे, दिर, पती हे सर्व माझा व्यवस्थित सांभाळ करीत होते तरीदेखील मी त्यांच्याविरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पतीसोबत पुन्हा नांदण्यासाठी कोणतीही केस दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या पतीसोबत नांदायचेच नसल्याने मी तशी कोणतीही केस केलेली नाही.

**२२.** हे म्हणणे खरे नाही की, कामाच्या ठिकाणी सामनेवाले यांनी त्रास देवू नये, अशी मी प्रस्तुत अर्जात मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आताही नोकरी करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच मी निशाणी ०१ कडील अर्जामध्ये कलम १८ नुसार संरक्षणात्मक आदेश यासदरी कामाच्या जागी जाण्यासाठी शिरकाव करण्यास प्रतिबंधक यास खुण केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पती व त्याचे नातेवाईक पुणे येथे रहाण्यास असल्याने त्यांचे गावाकडे येणे–जाणे कमी असते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती व त्याच्या नातेवाईकांनी माझ्या माहेरी येवून

मला कधीही त्रास दिलेला नाही.

२३. **प्रश्नः–** तुमचे पती व त्याचे नातेवाईकांनी तुम्हाला तुमच्या कामाच्या जागी येवून कधीही त्रास दिलेला नाही, हे बरोबर आहे काय ?

**उत्तरः–** मी कामाला जातच नव्हते व नाही.

२४. हे मला माहिती नाही की, माझे सासरे नोव्हेंबर–२०२५ मध्ये मयत झाले आहेत अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या मयत विधीवेळी मी किंवा माझे नातेवाईक हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांच्यासोबत पुर्णपणे संबंध तोडलेले आहेत. हे मला माहिती नाही की, माझे पती सध्या शाळेमध्ये शिपाई म्हणून नोकरी करतात व त्यांना दरमहा रक्कम रु. १०,०००/– पगार आहे अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीवर त्याच्या आईची जबाबदारी आहे.

२५. हे म्हणणे खरे नाही की, मी सध्या नोकरीला असून मला त्यातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला पोटगीची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ सध्या नोकरी करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या माहेरची परिस्थिती चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी आले त्यावेळी माझे सर्व स्त्रीधन सोबत घेवून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मीच संसार करण्यास असमर्थ ठरले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला आजही माझ्या पतीसोबत नांदायची इच्छा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला नुकसानभरपाईची कोणतीही आवश्यकता नाही.

२६. हे म्हणणे खरे नाही की, मी खोट्या वस्तुस्थितीवर आधारित प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जामध्ये मी सामनेवाल्यांच्या विरुध्द केलेले आरोप व मागणी खोटे व चुकीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी

मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.08.13 18:08:20 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांकः १३/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

–:CERTIFICATE:–

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :– | A. A. Shivalkar |
| Court Name | :– | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :– | 13/08/2026 |
| evidence signed by PO. on | :– | 13/08/2026 |
| evidence uploaded on | :– | 13/08/2026 |